MHAH080002862023

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १४९/२०२२</u>**
**<u>निशाणी क्र. २० वरील आदेश</u>**

प्रस्तुत अर्ज वादी यांनी त्याच्या वतीने त्यांचा मुलगा नुतन ज्ञानदेव भुजबळ यास सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल करून पुरावा देण्याची परवानगी मिळणेकामी केला आहे.

२. वादी अशी विनंती करतो की, वादीने प्रस्तुतचा दावा वाटप होवुन मिळणेसाठी केला आहे. वादीचे वय ७७ असून, त्यांना ऐकु न येण्याचा त्रास सुरू झाल्याने डॉ. सोनांबेकर संगमनेर यांच्याकडे तपासणी केली असता, त्यांना दिनांक २२/११/२०२३ रोजी तसे प्रमाणपत्र दिलेले आहे. वादीचा मुलगा नुतन भुजबळ हा कुटूंब सदस्य असल्याने त्याला कौटुंबीक घडामोडीची, पुर्व इतिहासाची वैयक्तीक संपुर्ण माहिती आहे. त्या कारणाने दावा वाटपाचा असल्याने वादीच्या फांदी करीता प्रतिनिधीक स्वरूपात कुटूंब घटक म्हणून दाव्याचे काम वादी ऐवजी त्यांचा मुलगा नुतन ज्ञानदेव भुजबळ यांना सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल करून वादीच्या वतीने पुरावा देण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी तर्फे विद्वान वकीलांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवुन अर्जास आक्षेप नोंदविला. ते असे नमुद करतात की, वादी यांनी ऑडीयो लॉजीस्टचा रिपोर्ट दाखल केला नाही. सबब, त्यांनी सदर अर्ज रदद करण्याची विनंती केली आहे.

४. मी दोन्ही पक्षांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा हा वादीने वाटप होवुन मिळणेकामी केला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे वादीचे वय हे ७७ वर्षे असून त्यांना ऐकु येत नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्याकामी त्यांनी डॉ. अशोक सोनांबेकर यांचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. सदर प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, वादी यांची डाव्या कानाने ऐकु येण्याची क्षमता ४५ ते १०५ डेसीबल व उजव्या कानाने ४५ ते ११५ डेसीबल ऐकु येण्याची क्षमता दर्शविली आहे. वादीच्या वयोमानाप्रमाणे वादीची ऐकु येण्याची क्षमता कमी झाली असणार हे निश्चितच.

वादीच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचा मुलगा नुतन ज्ञानदेव भुजबळ यास कुटूंबाचा घटक म्हणून पुर्व इतिहासाची वैयक्तीक संपुर्ण माहिती आहे. तरी, दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरिता सदरचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. सदरचा अर्ज नामंजुर केल्यास वादीस त्याचा पुरावा देता येणार नाही. त्यामुळे, निश्चितच दोन्ही पक्षकांराचे नुकसान होणार आहे. माझ्या मते उपरोक्त वादींचा प्रस्तुतचा अर्ज मान्य केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तरी उपरोक्त वादींना त्यांच्यावतीने पुरावा देणेकामी त्यांचा मुलगा नुतन ज्ञानदेव भुजबळ यास परवानगी देणे योग्य होईल. याउलट त्यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास भविष्यामध्ये दाव्यात गुंतागुंत वाढण्याची शक्यता जास्त आहे. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

## **आदेश**

०१ अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२ वादीचा मुलगा नुतन ज्ञानदेव भुजबळ यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र पुढील तारखेपर्यंत दाखल करावे.

GAIKWAD MOHINI JANU
Digitally signed by GAIKWAD MOHINI JANU
Date: 2024.07.20 14:17:24 +0530

दिनांक : २०/०७/२०२४

(एम.जे.गायकवाड)
९वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
संगमनेर, ता.संगमनेर